# स्नेह समृध्दी मंडळ, देवरुख

प्रकल्प कार्यालय :- स्नेह समृध्दी मंडळ, देवरुख.

'श्रमसाफल्य' मधलीआळी,

देवरुख, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

भ्रमणध्वनी क्रमांक :- १) सौ. श्रध्दा रामचंद्र देशपांडे - अध्यक्षा, स्नेह समृध्दी मंडळ.

९७६९२५२९४०, ९४२३२९३४९१.

२) श्री. अनिल विनायक कुडाळकर - मुख्य कार्यकारी अधिकारी.

७५२२९४०००३, ९४२०१५६९५३.

ई.मेल :- ssmdevrukh@gmail.com

snehsamruddhi@yahoo.co.in

नोंदणी क्रमांक :- एफ ११८२ (पब्लिक ट्रस्ट) १९९४ (सोसायटी)

नोंदणी दिनांक :- १६ ऑगस्ट १९९३ रत्नागिरी, महाराष्ट्र,

कार्यक्षेत्र :- महाराष्ट्र राज्य.

संस्थापक :- श्री. रामचंद्र प्रभाकर देशपांडे.

विश्वस्त सूचि :-

| अ.क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १. | सौ. श्रध्दा रामचंद्र देशपांडे | अध्यक्ष |
| २. | सौ. शैलजा शांताराम कांगणे | उपाध्यक्ष |
| ३. | सौ. सुजाता आशिष प्रभुदेसाई | सचिव |
| ४. | सौ. दिपाली दिलीप कानडे | खजिनदार |
| ५. | सौ. दिपश्री दिलीप बोकील | सदस्य |
| ६. | सौ. युगंधरा रविंद्र आठल्ये | सदस्य |
| ७. | सौ. कविता आनंद नायगावकर | सदस्य |

संस्थेचे ध्येय :- समानतेच्या तत्वावर आधारित महिलांच्या सक्षमीकरणावर लक्ष केंद्रीत करुन समाजातील सर्व घटकांचा आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विकास घडवून आणणे.

ध्येय साध्य करण्यासाठी हाती घेतलेले उपक्रम :-

वरील ध्येय प्राप्त करण्यासाठी महिला, युवक आणि पुरुषांकरिता विविध प्रकारचे प्रशिक्षण, प्रात्यक्षिक तसेच समुपदेशनासाठीचे प्रकल्प विविध व्यक्ती, संस्था आणि शासन यांच्या सहकार्याने आयोजित करणे.

# संस्थेची रचना

अध्यक्ष

↓

विश्वस्त

↓

मुख्य कार्यकारी अधिकारी

↓

कर्मचारी

# आरोग्यविषयक कार्यक्रम

बचतगटातील महिलांनी स्वतःच्या आणि कुटूंबाच्या आरोग्याची काळजी घेणे खुप महत्वाचे होते. ग्रामीण भागातील महिला आजारांबाबत खुपच अज्ञानी होत्या. आजारांबद्दल त्यांच्या मनात सतत भीती असायची. एखादा आजार झाला तरी स्वतःहुन सांगण्यास त्या तयार होत नसल्याकारणाने आजार बळावत जायचा. हे लक्षात घेऊन संस्थेने सन २००३ मध्ये १८ ते ५० वयोगटातील महिलांसाठी विशेष कार्यक्रमांचे आयोजन केले. यामध्ये पुढील प्रमाणे उपक्रम राबविण्यात आले.

- किशोरवयीन मुलामुलींचे गट तयार करुन त्यांच्यामार्फत आरोग्य शिक्षण.
- माता व बाल संगोपन, सकस आहार, आरोग्याच्या चांगल्या सवयींबाबत माहिती.
- कुटूंब नियोजन, एड्स व इतर लैंगिक आजारांविषयी सातत्याने जनजागृती.
- माध्यमिक शाळेतील विदयार्थ्यांसाठी कुटूंब जीवन शिक्षणावर व्याख्याने.
- महिलांच्या पुढाकाराने गाव आरोग्य समित्यांची स्थापना.
- रक्तगट तपासणी व गाववार रक्तगट सूची.
- आरोग्य यंत्रणा व लोकांमध्ये समन्वय.

अशांसारखे उपक्रम घेण्यात आले, ज्यांमुळे लोकांची आजारांविषयीची भीती कमी झाली. आणि महिला आपल्या आजारांबाबत मोकळेपणाने बोलू लागल्या. स्वतः आणि कुटूंबातील इतर सदस्यांना उपचारांसाठी आरोग्यकेंद्रामध्ये घेऊन जाऊ लागल्या. ज्यांमुळे आजार बळावण्याची संख्या कमी झाली.






# तंत्रज्ञान घरोघरी कार्यक्रम

बचतगटांसोबत काम करीत असताना असे लक्षात आले की, ग्रामीण भागातील या कुटूंबांना आधुनिक तंत्रज्ञानाचीही ओळख होणे आवश्यक होते. तरच ते बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगामध्ये स्वतःचा विकास करण्याच्या दृष्टीने पाऊल टाकू शकतील. यासाठी त्यांना दैनंदिन जीवनातील वापरात असणाऱ्या उपकरणांची ओळख करुन देणे, ती वापरण्यासंबंधीची माहिती करुन देणे, उपकरणांची देखभाल व दुरुस्ती करुन घेता यावी, याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. सौर उर्जेचे महत्व पटवून देवून सोलर कुकरचे डेमो दाखवण्यात आले. संस्थेने तंत्रज्ञान घरोघरी हा कार्यक्रम १९९२ मध्ये शासकीय तंत्रनिकेतनच्या सहाय्याने हाती घेतला.

यांमुळे महिलांना तांत्रिक उपकरणे वापराविषयीची भिती कमी झाली. उपकरणांची माहिती मिळाल्यामुळे उपकरणांच्या देखभाल आणि दुरुस्ती मध्ये होणारी त्यांची आर्थिक फसवणूक यामुळे आटोक्यात आली.

# ग्राहक हक्क चळवळ कार्यक्रम

महिलांना आणि पर्यायाने त्यांच्या कुटूंबाला आर्थिक विकासाच्या दिशेने न्यायचे असेल तर, त्यांच्या दैनंदिन जीवनातील आर्थिक बाबींवर लक्ष देण्यास शिकविणे महत्वाचे होते. यासाठी १९९६ मध्ये शासनाच्या मदतीने ग्राहक हक्क चळवळ सुरु करण्यात आली. दुकानदारांकडुन तसेच शासनाच्या रास्त दरातील धान्य दुकानदारांकडून ग्राहकाला कोणत्या सेवा मिळणे अपेक्षित आहे, वस्तू खरेदी करताना ग्राहकांची फसवणूक होऊ नये यासाठी मार्गदर्शन करणे, वस्तुंची वॉरंटी, गॅरंटी याविंषयी माहिती देणे, व्यापाऱ्यांकडून होणारी आर्थिक पिळवणूक थांबवविण्यासाठी गिऱ्हाईकाने ग्राहक मंचाकडे तक्रार करणे आवश्यक असते, हे समजावून सांगणे. अशाप्रकारे काम करण्यात आले. संस्थेच्या अध्यक्षा

सौ. श्रदधा देशपांडे या ग्राहक मंचावर NGO प्रतिनिधी म्हणून सदस्या असल्याने महिलांना त्यामध्ये होणारे धोरणात्मक बदल, ग्राहकपेठेविषयी माहिती व मार्गदर्शन करणे अधिक सोयीचे झाले.



# पंचायतराज

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी सोबत सन २००३ मध्ये काम करीत असताना, महिलांसाठी ३३% आरक्षण आल्यावर आपली जबाबदारी होती की, महिलांनी पंचायत राज मध्ये सहभाग घ्यावा. त्यादृष्टीने महिलांची प्रशिक्षणे घेण्यात आली. त्यावेळी बऱ्याचशा ग्रामपंचायत हया व्यक्ती केंद्रीत ग्रामपंचायती होत्या. प्रशिक्षणांच्या माध्यमातून ग्रामपंचायत राज मधील नवीन कायदे महिलांपर्यंत पोहोचले, त्यामुळे महिलांना ग्रामपंचायतीतील त्यांच्या सहभागातील महत्व याची जाणीव झाली. महिला सभांमध्ये योग्य कायदेशीररित्या बोलू लागल्या. निवडणुका होऊ लागल्या. आणि ग्रामपंचायतीमंधील महिलांचा सहभाग वाढू लागला.

# विकास अनुभव

कोकण विकास समन्वय व्यासपीठ, यांच्या सहकार्याने ग्रामीण भागातील युवक व युवतींकरीता सन २००२ मध्ये उपक्रम राबविण्यात आला. यामध्ये त्यांच्या व्यक्तिमत्व विकासाच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात आले. त्यांना वेगवेगळया विषयांची माहिती देण्यात आली. एक्सपोजर व्हिजीट करण्यात आल्या. जेणेकरुन तालुक्यातील युवक युवतींना त्याचा चांगल्या प्रकारे फायदा करुन घेता येईल.

# सामुहिक खरेदी व वाटप कार्यक्रम

सन २००३ मध्ये बाजारपेठा आणि खरेदी-विक्री याचे मार्गदर्शन गटातील महिलांना करीत असताना, यामध्ये प्रामुख्याने दैनंदिन व्यवहारामध्ये लागणारा किराणा माल व रेशनिंग यासाठी लागणारा खर्च किती होतो ते बघून त्याच वस्तू आपण होलसेल दराने खरेदी केल्या तर त्यामध्ये आपली किती आर्थिक बचत होऊ शकते हे समजावून सांगण्यात आले. त्याचा परिणाम म्हणजे

बचतगटामधील महिलांनी होलसेल दराने किराणा माल खरेदी करुन तो गावामध्ये योग्य दराने विकण्याचा उपक्रम राबविला. त्यासाठी त्यांना त्यांच्या जवळपासच्या दुकानदारांशी संस्थेने जोडून दिले. अगदी मोटर सायकल वरुन खरेदी विक्रीची सुरु झालेली ही प्रक्रिया पुढे रिक्षा टेम्पोने माल खरेदी विक्री करणेपर्यंत वाढली. ज्यांचा गटांतील महिलांना खुप चांगला उपयोग झाला.

## अन्न व सुरक्षा कार्यक्रम अंतर्गत सर्वेक्षण

अन्न व सुरक्षा कार्यक्रमाअंतर्गत कार्यशाळा




अन्न व जमीन अधिकार विभागीय कार्यशाळा



## SNDT सर्वेक्षण

सना युनिर्व्हसीटी यमेन यांच्या सहयोगाने SNDT मार्फत सर्वेक्षण करण्यात आले. यामध्ये शाळाबाहय मुलींचा सर्वे करण्यात आला. शाळाबाहय मुलींची स्थिती जाणून घेऊन त्याची मांडणी यामध्ये करण्यात आली. संस्थेच्या अध्यक्षा सौ. देशपांडे मॅडम या कमिटीच्या मेंबर होत्या.



# समृध्दी एक्सलन्स सेंटर

लार्सन ॲन्ड टुब्रो पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टच्या आर्थिक सहकार्यातून अन्न आणि फळ प्रक्रिया प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्यात आली.

- संगमेश्वर तालुक्यातील उदयोगाची कास धरुन आर्थिक दृष्टया स्वावलंबी होण्यासाठी झटणाऱ्या महिलांना कौशल्य प्रशिक्षण देणारे अद्ययावत प्रशिक्षण केंद्र.
- उत्पादित मालाच्या विक्री व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन करणारे केंद्र.
- विशेषतः कोकणातील फळे, भाज्या व शेतमालावर प्रक्रिया करण्याचे कौशल्य शिकविणारे केंद्र.
- लार्सन ॲण्ड टुब्रो पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टच्या आर्थिक सहकार्यातून सुरु झालेले केंद्र.

अन्न आणि फळ प्रक्रिया, पॅकेजिंग व बाजारपेठ व्यवस्थापन विषयी प्रशिक्षण कार्यक्रम






















ग्रामीण भागातील महिलांना प्रशिक्षणाच्या निमित्ताने एकत्र आल्यामूळे एक आत्मविश्वास वाढणे, एकत्र येण्याची संधी मिळणे, वैचारिक देवाण-घेवाण करणे, कुटुंबामधील त्यांचा दर्जा या विषयाच्या अनुषंगाने निर्णय प्रक्रियेमध्ये त्यांनी सहभागी होण्याच्या दृष्टीने चार चांगले पदार्थ करता येणे, सूज्ञपणे स्वत:बरोबरच आपल्या कुटुंबाच्या आरोग्याचा विचार करणे अगत्याचे असावे, इतर विषयांची माहिती मिळविण्याची संधी मिळणे या सर्व बाबींच्या दृष्टीने अतिशय चांगला बदल महिलांमध्ये घडून आल्याचे जाणवले. या प्रशिक्षणांमध्ये विविध अन्न आणि फळ प्रक्रिया पदार्थांसोबतच पॅकेजिंग, बाजारपेठांचा अभ्यास यांविषयी सुध्दा मार्गदर्शन करण्यात आले.

# उन्नती बांधकाम कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम

ग्रामीण भागातील सामान्य महिला प्रगतीच्या नव्या वाटा शोधताना इथला गरजू, होतकरु, अल्पशिक्षित तरुण वर्ग मात्र आर्थिक प्रगती आणि रोजगाराच्या बाबतीत चाचपडताना दिसून येतो. ही परीस्थिती बदलण्यसाठी स्नेह समृध्दी मंडळ या संस्थेमार्फत लार्सन ॲन्ड टुब्रो पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टच्या आर्थिक सहकार्यातून उन्नती बांधकाम कौशल्य प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्यात आली.

लार्सन ॲन्ड टुब्रो (L&T) या जगप्रसिध्द बांधकाम कंपनीची पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टच्या सहकार्याने बांधकाम क्षेत्रात आयुष्य घडविण्यासाठी गवंडीकाम (मेसनरी) आणि सळीकाम (बारबेंडींग) या विषयांचे प्रशिक्षण देणारे हे केंद्र स्थापन करण्यात आले. तीन महिन्यांच्या कालावधीचे हे प्रशिक्षण होते. केंद्रावरील राहण्याची खाण्या-पिण्याची सोय, अत्याधुनिक साधनांचा वापर करुन प्रशिक्षत ट्रेनर यांच्याकडून दिले जाणारे प्रशिक्षण यामुळे संस्थेच्या कार्यक्षेत्रातील बेरोजगारांना अतिशय चांगला पर्याय होता. १० वी, १२ वी नंतर खेडोपाडयातील मुलांना शिक्षणाची आवड असूनही शिक्षण घेता येत नाही अशी मुलं एकतर उनाड म्हणून गणली जातात किंवा सांगली, मुंबई सारख्या ठिकाणी हॉटेलमध्ये वेटर म्हणून काम करण्यात धन्यता मानतात. त्यापेक्षा या क्षेत्रामध्ये येवून पुढील भवितव्यासाठी हा तीन महिन्यांचा कोर्स पूर्ण करुन जॉबची संधी मिळत असेल तर केव्हाही चांगलेच आहे. अशा विचाराने सुमारे ९४ एवढया युवकांनी गवंडीकाम व ३०९ एवढया युवकांनी सळीकाम या प्रशिक्षणांमध्ये सहभाग घेतला. उन्नती बांधकाम कौशल्य प्रशिक्षण केंद्रातील कोर्स पूर्ण केल्यानंतर (L&T) मार्फत १३९, लोकल साईटवर ७८ आणि ८३ एवढया प्रशिक्षणार्थींनी स्वतःचा व्यवसाय सुरु केला आहे. ज्याचा त्यांच्या भवितव्यासाठी फार मोठा फायदा झाला आहे. ज्या युवकांचा प्रशिक्षणाच्या आधिपासूनच व्यवसाय सुरु होता अशा युवकांना त्यांच्या कामाचा दर्जा सुधारण्यासाठी व कमी वेळेमध्ये योग्य तंत्रज्ञानाचा उपयोग करुन उत्कृष्ट दर्जाचे काम कसे करता येईल हे शिकण्याची संधी उपलब्ध झाली.









प्रमाणपत्र वितरण सोहळा


Other Activities
Discussion With Student's Sub. - Personality Development
Discussion With Student's Sub. - Capacity Building
Discussion With Student's Sub. - Planning & Management
Discussion With Student's Sub. - Social Responsibility
Discussion With Student's Sub. - Communication
Discussion With Student's Sub. - Placement
Receiving Momento from President of L & T, India
Participant of L & T Workshop
Larsen & Toubro Public Charitabel Trust & Sneh Samruddhi Mandal (Joint Venture)


यशोगाथा
प्रकाश बाळासो पाडगे, कोल्हापूर प्रशिक्षण कालावधी : १ जुलै २०१२ ते ३० सप्टेंबर २०१२
कामाचे ठिकाण : एम. एस. पी. सी. नॅशनल स्कील डेव्हलपमेंट कार्पोरेशन, पुणे.
पद : डेमोस्ट्रेटर पगार : महिना २०,०००/- मोबा. : ८७९३०६९८२०
अण्णा भगवान चव्हाण, सातारा प्रशिक्षण कालावधी : १ ऑक्टोबर २०१२ ते ३१ डिसेंबर २०१२
कामाचे ठिकाण : आर. एस. के. इंजिनिअरींग इंडिया प्रा. लि.
पद : सुपर वायझर पगार : महिना १८,०००/- मोबा. : ९०११०२९४७५
राजेश शांताराम रेवाळे, दाभोळे प्रशिक्षण कालावधी : १ ऑक्टोबर २०११ ते ३१ डिसेंबर २०११
कामाचे ठिकाण : स्थानिक कॉन्ट्रॅक्टर
पद : कॉन्ट्रॅक्टर पगार : महिना १५,०००/- मोबा. : ९८६०८५४१७८
स्नेह समृध्दी मंडळ आणि लार्सन ॲण्ड टुब्रो पब्लिक
चॅरिटेबल ट्रस्ट संचलित बांधकाम कौशल्य प्रशिक्षण केंद्र


Larsen & Toubro Public Charitabel Trust &
Sneh Samruddhi Mandal (Joint Venture)
Construction Skill Training Center, Devrukh
Training Center
Demo Room
Office
Class Room
Practical Yard
Practical Yard
Student's Hostel
Trainees
Larsen & Toubro Public Charitabel Trust & Sneh Samruddhi Mandal (Joint Venture)


Visit To Training center
Mr. A. Janakumar (Former Regional Training Manger (RTM) CSTI, L&T-ECC, Panvel)
Mr. A. D. Shahane (Vice President Corporate Training Technical, Larsen & Toubro)
Mr. R. P. Deshpande (Secretary LTPCT)
Mr. A. D. Shahane (Vice President Corporate Training Technical, Larsen & Toubro)
Mr. S. Bhouraskar (Former Regional Training Manger (RTM) CSTI, L&T-ECC, Panvel)
Mrs. S. M. Kambale (Project Co-ordinator LTPCT)
Mr. S. Bhouraskar (Former Regional Training Manger (RTM) CSTI, L&T-ECC, Panvel)
Mr. T. K. Ayyappan : Sr. Lecturer (L&T Institute of Technology)
Mr. R. P. Deshpande (Secretery LTPCT)
Mr. Bansode (Representative L&T)
Larsen & Toubro Public Charitabel Trust & Sneh Samruddhi Mandal (Joint Venture)

# शैक्षणिक कार्यक्रम

❍ **साक्षरता अभियान –** महिलांचा सर्वांगीण विकास घडवायचा असेल तर ती महिला आणि तिचे कुटूंब साक्षर असणे खुप महत्वाचे होते. सन १९९३ मध्ये शासनाच्या साक्षरता अभियानामध्ये संस्थेने सक्रीय सहभाग घेऊन आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनाचे औचित्य साधून या अभियानामध्ये सहभागी होऊन या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन संस्थेच्या माध्यमातुन करण्यात आले. बचतगटांतील बहुतांश महिला या निरक्षर होत्या. त्यांना शिक्षणाचे महत्व पटवून देऊन गटातील शिकलेल्या महिलांच्या मदतीने निरक्षर महिलांना साक्षर करण्याचा प्रयत्न केला. बचतगटांच्या माध्यमातून महिलांचा सराव घेण्यात आला.

❍ **साक्षरोत्तर अभियान –** शासनाने साक्षरता अभियान राबविले, परंतु साक्षरता अभियानामध्ये केवळ सही करता येणे एवढेच अपेक्षित नव्हते तर साक्षरतेमुळे लोकांचे राहणीमान सुधारावे आणि त्यांच्यामध्ये चांगला बदल घडून यावा हे अपेक्षित होते. यासाठी शासनाने १९९५ मध्ये साक्षरोत्तर अभियान राबविले. यामध्ये गटातील लोकांनी स्वयंसेवक म्हणून काम केले. संस्थेचा महिला सक्षमिकरणाचा उद्देश साध्य करण्याच्या दृष्टीने हे अभियान अतिशय महत्वाचे असल्याने संस्थेने यामध्ये उत्स्फुर्त सहभाग घेतला होता. ज्याचा चांगला परिणाम गटांमधील महिलांना आणि त्यांच्या कुटूंबातील सदस्यांवर झाला.

❍ **शैक्षणिक प्रकल्प –** ग्रामीण भागामध्ये शिक्षणाचे महत्व पटले असले तरी अनेक कुटुंबांची आर्थिक स्थिती हालाखीची असल्यामुळे त्या कुटुंबातील मुलांना शिक्षणापासून वंचित रहावे लागते. शिक्षण क्षेत्रात सरकारकडून अनेक प्रकारच्या सवलती मिळत असल्या तरी ग्रामीण भागातील सर्वच कुटुंबाना याचा लाभ मिळत नाही. आर्थिकदृष्टया दुर्बल असणाऱ्या कुटुंबातील पालकांना शिक्षणासाठी आवश्यक असणाऱ्या सुविधा, वस्तु मुलांना पुरवणे शक्य होत नाही. कुटुंबातील मुलांची संख्या जास्त असेल तर यामध्ये विशेषतः मुलींना शिक्षण सोडून दयावे लागते. अशा कुटुंबातील मूलामुलींना जर शिक्षण मिळाले तरच ते कुटूंब प्रगतीची वाटचाल करु शकेल. याकरीता प्रथम आपण या कुटूंबातील मूलांना चांगल्या प्रकारचे शिक्षण घेण्यास मदत करु या उद्देशाने स्नेह समृध्दी मंडळ स्वतः तसेच काही संवेदनशिल आणि सामाजिक जाणीव असणाऱ्या देणगीदारांकडुन मुलांना शैक्षणिक प्रकल्पाच्या माध्यमातून सन २०१६ पासून आर्थिक मदत करीत आहे. यामध्ये विशेषतः मुलींच्या शिक्षणासाठी अधिक प्राधान्य देऊन त्यांना या प्रकल्पामधून कसा लाभ देता येईल यासाठी संस्था प्रयत्न करीत आहे. यामधूनच अशाच संवेदनशील आणि सामाजिक जाणीव असणाऱ्या स्वयंसेवकांकडून हेल्पलाईन या उपक्रमाच्या

माध्यमातून विदयार्थी आणि विशेषतः विदयार्थ्यीनींना शैक्षणिक मार्गदर्शन करुन भविष्यामध्ये त्यांना आर्थिकदृष्टया स्वतःच्या पायावर उभं राहण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन करण्यात येत आहे.

## शैक्षणिक सहाय्य प्राप्त काही विदयार्थी आपल्या पालकांसमवेत



